आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

५ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी एकत्रितरित्या काम करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचं लोकार्पण, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधीचा पुढचा हप्ता वितरीत

- लाडकी बहीण योजना बंद करण्याची कोणामध्येही हिंमत नाही, विविध निर्णयांमुळं राज्य सरकार लाडकं सरकार झाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन

- भारताची राज्यघटना हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेचं आजच्या काळातलं प्रतीक असल्याचं राहुल गांधी यांचं कोल्हापुरात प्रतिपादन

**आणि**

- हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू

**<><><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्र्यांनी आज केलं. तसंच कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प त्यांनी राष्ट्राला समर्पित केलं.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करणाऱ्या १९ मेगावॅट क्षमतेच्या ५ सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोला, बुलढाणा आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे सौर प्रकल्प आहेत. हे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारायला मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना प्रधानमंत्र्यांनी २० कोटी ५५ लाख रुपये विकासनिधी दिला.

लाडकी बहीण योजना बंद करण्याची हिंमत कोणामध्येच नाही. राज्य सरकारनं घेतलेल्या विविध निर्णयांमुळं आपलं सरकारं हे लाडकं सरकार झालं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नेहमीच राज्याला भरभरून देतात आणि आमच्याकडून काम करुन घेतात, असं ते म्हणाले. आजचा दिवस आनंदाचा असून सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्याचा आहे. यामुळं खऱ्या अर्थानं बंजारा समाजाची काशी इथं उभी राहिली असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढावं, शेतमालाला चांगली किंमत मिळावी, यासाठी प्रधानमंत्र्यांनी विविध निर्णय घेतले असे गौरवोद्गार केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काढले.

पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप आणि स्वदेशी बनावटीच्या लिंग-वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाची सुरुवात प्रधानमंत्र्यांनी आज केली. शेतकऱ्यांना या सुविधा कमी दरात उपलब्ध होणार असल्याचं केंद्रीय पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंग म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयामुळं देशातलं दुध उत्पादन वाढवायला मदत झाल्याचं ते म्हणाले.

पोहरागडाला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले प्रधानमंत्री आहेत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संग्रहालयाचं, त्यातल्या दर्जेदार कामाचं कौतुक केलं. सर्वांनी हे संग्रहालय पहायला यावं, असं आवाहन त्यांनी केलं. तसंच

पोहरादेवी मंदिर परिसराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

राज्यातले मंत्री संजय राठोड यांनी यावेळी बोलताना बंजारा समाजाच्या हितासाठी विविध मागण्या केल्या. त्यात देशभरातल्या बंजारा समाजाला एका अनुसूचित समाविष्ट करणं, बंजारा भाषेचा संविधानाच्या ८ व्या सूचीमध्ये समावेश करणं, बंजारा तांड्यांमध्ये पायाभूत सुविधा, राष्ट्रीय स्तरावर तांडा विकास परिषद स्थापन करणं यासारख्या मागण्या त्यांनी केल्या. पोहरादेवीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या मदतीची आणि वाशिम आणि यवतमाळमध्ये रोजगाराच्या सुविधा निर्माण होण्यासाठी सवलतींची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

त्यापूर्वी वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी इथं बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन त्यांनी केलं. या ४ मजली संग्रहालयात बंजारा समाजाची माहिती देणारी १३ प्रदर्शनं आहेत. प्रधानमंत्र्यांनी यावेळी जगदंबा देवी आणि सेवालाल महाराजांचं दर्शन घेतलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सर्वजण एकत्र राहून विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी काम करू, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाशिममधल्या पोहरा देवी इथं केलं. राज्यातल डबल इंजिन सरकारनं नागरिकांच्या विकासासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. नदी जोड प्रकल्पाचा शेतकऱ्यांना फायदा होईल. असं ते म्हणाले. बंजारा समाजातल्या योगदानाची आठवण त्यांनी यावेळी काढली. इंग्रजांनी बंजारा समाजावर निर्बंध लादले. काँग्रेसनं या समाजासाठी काहीही प्रयत्न केले नसल्याचा आरोप प्रधानमंत्र्यांनी केला.

यावेळी त्यांनी काँग्रेस आणि महाविकास आघाडी सरकारवर कठोर शब्दात टीका केली. महाविकास आघाड़ी सरकारनं शेतकऱ्यांच्या योजनांमध्ये, सिंचन प्रकल्पांमध्ये

अडथळे निर्माण केले असा आरोप त्यांनी केला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार विकासासाठी कार्यरत आहे. काँग्रेस नागरिकांना गरीबीत ठेवू इच्छितं, असा आरोप त्यांनी केला. शहरी नक्षलवादी हा पक्ष चालवत आहेत, असं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या काही लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात धनादेशाचं वितरण केलं.

<><><><><>

दुपारी ठाण्यात ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. ठाणे शहरात होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो आणि घाटकोपर जवळच्या छेडा नगरपासून ठाण्यातल्या आनंद नगरपर्यंतच्या पूर्वमुक्त महामार्गाच्या विस्तारीत भागाची पायाभरणी प्रधानमंत्री करतील. याशिवाय नैना अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकासकामांच्या पहिल्या टप्पा, ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचं भूमीपूजनही प्रधानमंत्री करतील. बीकेसी ते आरे दरम्यानच्या मेट्रो ३ चं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ते मेट्रोतून प्रवासही करणार आहेत. प्रवासादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी, विद्यार्थी आणि कामगार यांच्याशी संवाद साधतील. याशिवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेचं आजच्या काळातलं प्रतीक म्हणजे भारताची राज्यघटना आहे. ही विचारधारा महाराष्ट्राच्या मातीनं, जनतेनं घडवलेली आहे. शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या विचारातून राज्यघटना साकारली

असल्याचं प्रतिपादन लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलं. कोल्हापूर जिल्ह्यात कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर ते बोलत होते. शिवरायांनी ज्या गोष्टींसाठी आयुष्यभर लढा दिला, त्यासाठी आज आपण उभे राहिलो नाही, तर पुतळा उभारणं निरर्थक आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. शिवरायांच्या विचारधारेचं, राज्यघटनेचं रक्षण करण्याचं आवाहन त्यांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना केलं.

त्यानंतर कोल्हापूरात झालेल्या संविधान संमेलनात राहुल गांधी यांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचं आश्वासन दिलं. तसंच जातनिहाय जनगणना, सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करणार असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्याचं नाव आता अहिल्या नगर झालं आहे. हे नामकरण करणारी अधिसूचना राज्य सरकारनं काल राजपत्रात प्रसिद्ध केली. केंद्रीय गृहमंत्रालयानं १ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या पत्रात या नामकरणाला मंजुरी दिली होती. त्यामुळं अहमदनगर जिल्हा, तालुका आणि शहराचे नाव आता अहिल्यानगर झाले आहे.

**<><><><><>**

हरयाणा विधानसभेच्या सर्व ९० जागांच्या निवडणुकीसाठी आज सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. मतदारांना संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मत देता येईल. या निवडणुकीसाठी दुपारी १ वाजेपर्यंत अंदाजे सरासरी ३६ टक्के मतदानाची नोंद झाली असल्याचं तिथल्या निवडणूक प्रशासनानं कळवलं आहे. या निवडणुकीसाठी रिंगणात असलेल्या एक हजार ३१ उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद होईल.

**<><><><><>**

राष्ट्रविरोधी कारवायांशी संबंधित प्रकरणात एन आय ए म्हणजेच राष्ट्रीय तपास संस्थेनं आज महाराष्ट्रासह जम्मू काश्मीर, उत्तर प्रदेश, आसाम आणि दिल्लीत २२ ठिकाणी छापे टाकले. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या कारवायांशी संबंध असल्याच्या संदर्भात ही छापेमारी सुरु आहे.

देशविघातक कृत्यात सहभागी असल्याचा संशयातून महाराष्ट्रातही एन आय ए आणि दहशतवाद विरोधी पथकानं मोठी कारवाई करत अनेक ठिकाणी छापे टाकले. याअंतर्गत छत्रपती संभाजी नगर, जालना आणि मालेगाव इथून  काहीजणांना ताब्यात घेतलं आहे.  एनआयएनं  संभाजीनगर मधून तीन जणांना ताब्यात घेतलं तर मालेगाव शहरात दोन ठिकाणी छापे टाकले . संशयितांची  कसून चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर मध्ये कुपवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणारे दोन दहशतवादी आज मारले गेले. कुपवाडा इथं गुगलधर परिसरात घुसखोरीसंदर्भात माहिती मिळताच सुरक्षा दल आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या पथकानं ही संयुक्त कारवाई केली.

**<><><><><>**

छत्तीसगढ मध्ये नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी  आणखी तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह  ताब्यात घेतले  आहेत. त्यामुळे या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या ३१  झाली आहे.

**<><><><><>**

पाकिस्तान सरकारनं इस्लामाबाद या राजधानीच्या शहराच्या सुरक्षेची जबाबदारी पाकिस्तान लष्कराकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. सातत्यानं होत असलेली हिंसक निदर्शनं, आंदोलनं, विस्कळीत मोबाईल आणि इंटरनेट सेवा या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. इस्लामाबाद आणि रावळपिंडी या

शहरांमध्ये तेहरीक- ए-इन्साफ आणि सुरक्षा दलांमध्ये काल मोठ्या प्रमाणावर चकमकी उडाल्या.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर येत्या १५ आणि १६ तारखेला पाकिस्तान मध्ये  होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी इस्लामाबादला जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल याबाबत माहिती दिली.

<><><><><>

येमेनमध्ये हौथी या संघटनेच्या नियंत्रणाखाली असलेल्या अनेक ठिकाणांवर अमेरिका आणि ब्रिटनच्या लष्करी दलांनी संयुक्त हल्ले केले. या क्षेत्रात इराणचा वाढत्या प्रभावाला रोखण्याच्या उद्देशानं हा हल्ला केला गेल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय करार केला जावा अशी मागणी भारतानं पुन्हा एकदा संकुत् राष्ट्रंसघाकडे केली आहे. यासंबंधीचा प्रस्ताव भारतानं पहिल्यांना ३० वर्षांआधी मांडला होता. नुकत्याच झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत, भारताच्या संयुक्त राष्ट्र संघातल्या विधी अधिकारी आर. मैथिली यांनी महासभेच्या विधी समितीला संबोधित करताना या मागणीचा पुनरुच्चार केला.

<><><><><>

मंकीपॉक्स या आजारावरच्या पहिल्या निदान चाचणीला मान्यता दिली असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं जाहीर केलं आहे. ही मान्यता आपत्कालीन परिस्थितीतील वापरासाठी दिली गेली आहे.

//<><><><><>//